
गोष्टीरूप
महाभारत
भाग १
ज्ञानेश्वर म. कुलकर्णी
परी प्रकाशन







**गोष्टीरूप महाभारत**
**भाग १**

◆ ————————

© सुरक्षित

◆ ————————

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ————————

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ————————

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ————————

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ————————

**किंमत :**
रुपये १३०/-







# पांडवांचे पूर्वज (आदी पर्व)

महाभारताचे एकूण १८ पर्व आहेत. महाभारत संस्कृती आणि लोकजीवनाचा अमूल्य ठेवा आहे. 'महाभारतात जे नाही ते कोठेच नाही' असे म्हटले जाते. याचा अर्थ जे जे या जगात आहे ते ते सर्व महाभारतात आहे. यावरून महाभारताची व्याप्ती आणि स्वरूप लक्षात येईल.

महाभारत म्हटलं की काही ठळक गोष्टी डोळ्यासमोर येतात. कौरव-पांडवांचे युद्ध. श्रीकृष्णाने गीता सांगून अर्जुनाला केलेला उपदेश आणि अखेरीस सत्याचा असत्यावर विजय. धर्म आणि अधर्म यात धर्माचा विजय. इत्यादी अनेक गोष्टी डोळ्यासमोर येतात.

पण कौरव कोण होते ? पांडव कोण होते ? व्यासमुनी कोण होते ? त्यांचे पूर्वज कोण होते ? असे प्रश्न मनात निर्माण होतात. आपणाला पांडव-कौरवांचे पूर्वज जाणून घेण्याची जिज्ञासा असते. तो एक प्राचीन खूप मोठा कालखंड आहे. काहीसा क्लिष्ट आहे; परंतु आपण थोडक्यात तो जाणून घेऊ.

लोमहर्शण नावाचा एक प्रसिद्ध पुराणिक होता. त्याचा मुलगा उग्रसवा हासुद्धा प्रसिद्ध पुराणिक झाला. नैमिष अरण्यात शौनक नावाच्या कुलपतीने द्वादश वार्षिक सत्रासाठी मुनींना बोलावले होते. त्या ठिकाणी उग्रसवा गेला. नंतर मुनींच्या सांगण्यावरून त्याने महाभारताची कथा सांगायला सुरुवात केली होती.



वेदव्यासांनी महाभारतास सुरुवात करण्यापूर्वी गणेशाची आराधना केली होती. गणपती प्रसन्न झाल्यावर त्यास महाभारत लिहिण्याची विनंती केली होती. गणेशाने व्यासांचे म्हणणे मान्य केले. 'आपण तुम्ही सांगत असलेले महाभारत अखंडपणे लिहू, आपण सांगताना खंड पडू देऊ नये' असे सांगून गणपतीने महाभारत लिहावयास सुरुवात केली होती.

पराशर आणि सत्यवती यांचा पुत्र म्हणजे व्यास होय. सत्यवती नावाड्याची मुलगी होती. व्यास रंगाने काळे होते; पण स्वभावाने शांत, सत्यपालन करणारे ज्ञानी होते. त्यांनी वेदविद्या प्राप्त केली होती. महाभारताची संस्कृत श्लोकसंख्या एक लक्ष  आहे. व्यासांनी सांगितलेली आणि गणेशाने लिहिलेली महाभारताची कथा सुरस आहे.

चंद्रवंशात पुरूरवा जन्मला. त्याचा मुलगा आयु होता. आयुचा मुलगा नहुष. नहुषचा मुलगा ययाती होय.

ययातीला दोन स्त्रिया होत्या. पहिली शुक्रकन्या देवयानी आणि दुसरी असुर पर्वा यांची कन्या शर्मिष्ठा. देवयानीला यदू आणि तर्वसु हे पुत्र झाले. शर्मिष्ठाला द्रुद्‌द्यु, अनु आणि पुरू हे पुत्र झाले होते.

यदुच्या वंशात यादव राजे होऊन गेले. पुरू राजाच्या वंशात पौरव राजे होऊन गेले होते.

पुरूच्या पत्नीचे नाव षौष्टी होते. तिला प्रवीर, इश्वर आणि रौद्र असे तीन पुत्र झाले. प्रवीराच्या मुलाचे नाव मनुष्य होते. तो एक थोर राजा होता. लोकप्रिय राजा होता. मनुष्यच्या पत्नीचे नाव सौवीरी होते. सौवीरीला शपृ, संहनन आणि वाग्मी ही मुले झाले. त्यांच्या वंशात अनाधृष्टि राजा झाला. त्यांच्या मुलाचे नाव मतिनार होते. त्याला तनसू, महान, अतिरथ आणि दहयू असे मुलगे झाले. तनसू पराक्रमी राजा होता.

अशा प्रकारे पौरव वंश वाढत गेला. या वंशात इलिन हा पराक्रमी राजा झाला. त्याच्या पत्नीचे नाव होते रथंदरी. रथंदरी राणीला पाच मुले झाली. दुष्यंत, शूर, भीम, प्रवसु आणि वसु ही ती पाच मुले होय. यापैकी दुष्यंत पराक्रमी राजा होता. शकुंतलेस दुष्यंत यांच्यापासून जो मुलगा झाला तो भरत होय. भरत राजा हुशार होता, शूर होता. त्यास नऊ मुले होती. त्याचा भूमन्यू हा मुलगा पुढे गादीवर बसला. त्याचा दिवीरथ नावाचा शूर पुत्र पुढे राज्य करू लागला. त्यानंतर त्याचा सुहोत्र नावाचा मुलगा गादीचा वारस झाला. सुहोत्राने राज्याचा विस्तार केला होता.

सुहोत्र राजाची पत्नी सुवर्णा होती. तिचा मुलगा हस्ति होय. हस्ति राजाने पराक्रम केले. त्याने जे नगर वसवले तेच हस्तिनापूर होय. सुहोत्रचा मोठा मुलगा अजमीढ होय. अजमीढने राज्य केले. पुढे त्याच्या वंशातील राजांनी पांचाल देशावर अधिकार गाजवला.

पुढे या वंशात संवरण राजा झाला आणि राज्याची भरभराट झाली. या राजाच्या राणीचे नाव तप्ती होते. तिच्या मुलाचे नाव होते कुरू. कुरू राजा धार्मिक तपस्वी होता. त्याने ज्या ठिकाणी तप केले ते पुढे कुरुक्षेत्र या नावाने ओळखले जाऊ लागले.

कुरू राजाचा मुलगा होता अविक्षित. अविक्षितच्या मुलांपैकी परिक्षित हा पराक्रमी असल्याने राज्यकारभार तो करू लागला होता. राजा परिक्षितनंतर धृतराष्ट्र राजा झाला. त्यानंतर प्रतीप राजा झाला.

प्रतीप राजाने हरिद्वार येथे गेल्यानंतर तो नदीवर स्नान करण्यास गेला असता एक सुंदर कन्या पाहिली. ती गंगा होय. प्रतीप राजाने तिला आपली सून व्हावे असे सांगितले. तिने ते मान्य केले.

प्रतीप राजाला जो मुलगा झाला होता तो स्वभावाने खूप शांत असल्याने त्याचे नाव शांतनु ठेवले होते.

राजा शांतनु आणि गंगा यांची कथा सुरस आहे. महाभारताची कथा इथूनच सुरू होते.

✦

# राजा दुष्यंत आणि शकुंतला

पौरव वंशामध्ये दुष्यंत नावाचा शूर राजा होऊन गेला. तो कुरू वंशाचा आद्य प्रवर्तक मानला जातो. दुष्यंत राजा न्यायप्रिय होता. तो आपल्या प्रजेवर प्रेम करणारा होता. तो राज्यकारभार व्यवस्थितपणे करीत होता. तो धर्माने राज्यकारभार करीत होता. न्यायाने वागणाऱ्या या राजाकडूनसुद्धा अन्याय घडला होता.

दुष्यंत राजा वनामध्ये शिकार करण्यासाठी गेला होता. राजा शिकार करून दमून गेला होता. विश्रांतीसाठी राजा जागा शोधत होता. त्यावेळी नदीकिनारी असलेला आश्रम त्यास दिसला. तो कण्व ऋषींचा आश्रम होता.

महर्षी कण्व फळं आणि पूजेसाठी फुलं आणण्यासाठी बाहेर गेले होते. राजा दुष्यंत आश्रमासमोर आला आणि त्याने विचारले, ''आत कोणी आहे का ?''

आतून एका स्त्रीचा आवाज आला.

''आपण कोण आहात ?''

''मी राजा दुष्यंत.''

हे ऐकताच दार उघडण्यात आले. राजाने पाहिले तर समोर एक सुंदर युवती उभी होती. तिचे रूप पाहून राजा थक्क झाला होता. त्या युवतीने राजाला बसायला आसन दिले. ती म्हणाली, ''महाराज, आपण आमचे अतिथी आहात. आमच्या आश्रमात आपले स्वागत आहे. जलपान घ्यावे.''

राजाने विचारले, ''हा कोणाचा आश्रम आहे ?''

''महाराज, हा महर्षी कण्व ऋषींचा आश्रम आहे.''

''तुमचा परिचय काय ?''

''मी कण्व ऋषींची कन्या शकुंतला आहे.''

दुष्यंत राजाने फलाहार केला. थोडावेळ विश्रांती घेतली. राजा दुष्यंत शकुंतलेचे रूप पाहून मोहित झाला होता. शकुंतलेबरोबर गप्पा गोष्टी करीत असताना त्याने विचारले, ''माझ्या मनात एक शंका आहे. विचारू का ?''

''अवश्य विचारा महाराज. मी आपली शंका दूर करीन.''

''कण्व ऋषी तर ब्रह्मचारी आहेत, मग त्यांची कन्या कशी असू शकेल ?''

''अगदी बरोबर आहे आपली शंका. मी कण्व ऋषींची मानलेली मुलगी आहे. त्यांनीच अगदी लहानपणापासून मला माता-पित्याचे प्रेम दिले आणि माझे संगोपन केले आहे. माझे माता-पिता तेच आहेत.''

''शकुंतला, पण तुझे खरे माता-पिता कोण आहेत ? कोठे आहेत ते ?''

''महाराज, ती एक वेगळीच कथा आहे.''

''शकुंतला, मला ती कथा ऐकायची आहे.''

शकुंतला आपल्या माता-पित्याची कथा राजाला सांगू लागली. ती म्हणाली, ''पूर्वी विश्वामित्र नावाचे मोठे तपस्वी होऊन गेले होते. ते तप करीत बसले असता मेनका तेथे आली. मेनकेला पाहून विश्वामित्र मोहित झाले होते. विश्वामित्र आणि मेनका एकत्र राहू लागले. त्यांना एक कन्या झाली. विश्वामित्रांना आपली तपश्चर्या भंग झाल्याचे दु:ख वाटू लागले. ते मेनकेला आणि त्या तान्ह्या मुलीला सोडून निघून गेले. मेनकासुद्धा त्या बाळाला सोडून निघून गेली. ती तान्ही मुलगी रडत होती. तेथून जाणारे कण्व ऋषी त्या मुलीचा आवाज ऐकून तेथे आले. त्यांनी त्या मुलीला आपल्या आश्रमात आणले. तिचे मोठ्या प्रेमाने संगोपन केले. तिला आपली मुलगी समजून त्यांनी माया लावली. तिचे नाव शकुंतला होय.''

शकुंतलेची कहाणी ऐकून राजा म्हणाला, ''आता माझ्या मनातील शंका दूर झाली.''

शकुंतलेबरोबर गप्पा गोष्टी करीत असताना दुष्यंत म्हणाला, ''शकुंतला, तू मला आवडली आहेस. तू माझी पत्नी व्हावेस अशी माझी इच्छा आहे.''

राजा दुष्यंताचे बोलणे ऐकून शकुंतला लाजली. तिलासुद्धा दुष्यंत राजा आवडला होता. त्याचा रुबाबदारपणा तिला आवडला होता.

राजाने विचारले, ''शकुंतला, या क्षणी मी तुझ्याशी गांधर्व विवाह करण्यास तयार आहे.''

शकुंतला म्हणाली, ''पण माझी एक अपेक्षा आहे.''

''तुझी अपेक्षा मी पूर्ण करीन.''

''माझा पुत्र युवराज व्हावा.''



''मान्य आहे शकुंतला. तुझा पुत्र युवराज होईल. माझा वारस होईल.'' त्यानंतर शकुंतला आणि राजा दुष्यंत यांचा गांधर्व विवाह झाला. ते दोघेही आनंदी झाले होते.

राजा दुष्यंत जायला निघाला तेव्हा शकुंतलेने विचारले, ''नाथ, नंतर तुम्ही कधी येणार ?''

राजा म्हणाला, ''शकुंतला, तू माझी पत्नी आहेस. मी माझ्या राज्यात परत जाईन आणि वाजत गाजत तुला घेऊन जाईन.''

शकुंतला आनंदित झाली. ती म्हणाली, ''नाथ, आपण लवकर परत या. मी आपली प्रतीक्षा करीन.''

''ठीक आहे शकुंतला. मी लवकरच परत येईन.''

राजा दुष्यंत निघून गेला. कण्व ऋषी आश्रमात आल्यानंतर त्यांना ही गोष्ट कळली. शकुंतला घाबरलेली होती. ती म्हणाली, ''आपण माझी ही चूक पदरात घ्यावी. मला क्षमा करावी.''

कण्व ऋषी शांत झाले. ते म्हणाले, ''शकुंतला, तू माझी लाडकी सुपुत्री आहेस. अगं, तुझ्यावर मी रागावू शकत नाही.''

''आपण मला क्षमा केलीत ?''

''होय शकुंतला. अगं, विधिलिखित कोण टाळणार आहे !''

''म्हणजे आमच्या विवाहाला तुमची मान्यता आहे ना ?''

''होय. तुमच्या गांधर्व विवाहास माझी मान्यता आहे.''

शकुंतलेस खूप समाधान वाटले. त्या दिवसापासून ती राजा दुष्यंत परत येण्याची वाट पाहू लागली होती.

राजा दुष्यंत परत आला नाही. शकुंतलेला मुलगा झाला. ऋषींच्या आश्रमात त्याचे बारसे झाले. त्याचे नाव ठेवले होते – 'सर्वदमन'.

सर्वदमन तेजस्वी होता. तो शूर होता. कण्व ऋषींनी आणि शकुंतलेने त्याच्या मनावर चांगले संस्कार रुजवले होते. तो इतका धाडसी होता की, सहा वर्षाचा असतानाच तो वाघ, सिंहांना, वराह महिष यांना पकडून ओढत आणत होता. तो त्यांना झाडाला बांधून ठेवत होता. त्यांचे दमन करून त्यांच्यावर तो स्वार होत होता. त्याचा पराक्रम पाहून सर्वजण थक्क झाले होते.

एक दिवस कण्व ऋषी म्हणाले, ''शकुंतला, तू आता पतीच्या घरी जावेस. लग्नानंतर पत्नीने फार दिवस पितृगृही राहू नये.''

''मी आपणास सोडून कशी जाऊ ?''

''ते तुझे कर्तव्य आहे. तू आपले कर्तव्य पालन कर. सर्वदमनला घेऊन तू राजा दुष्यंताकडे जावेस. मी तुझ्यासोबत माझा एक शिष्य पाठवतो.''

''जशी आपली आज्ञा.''

शकुंतलेने प्रणाम करून आपल्या पित्याचा निरोप घेतला. ती शिष्यासह आपल्या मुलाला घेऊन राजा दुष्यंताच्या दरबारात येऊन पोहोचली.

शकुंतला राज्यसभेत येऊन पोहोचली होती. राजा दुष्यंतने तिच्याकडे पाहिले आणि विचारले, ''तू कोण आहेस ?''

''नाथ, आपण मला ओळखलं नाही ?''

''खरंच नाही ओळखलं. कोण आहेस तू ?''

''मी कण्व ऋषींची मुलगी शकुंतला.''

''खरंच मी ओळखू शकत नाही तुला.''

शकुंतला दु:खी झाली. ती म्हणाली, ''महाराज, आठवण्याचा प्रयत्न करावा. आपण एकदा कण्व ऋषींच्या आश्रमात आला होता. तेथे तुमची आणि माझी भेट झाली होती. आपण दोघांनी गांधर्व पद्धतीने विवाह केला होता.''

राजा दुष्यंत सिंहासनावरून उठला आणि म्हणाला, ''काय सांगतेस हे ! मला हे स्मरत नाही.''

''आपण आठवून पाहा महाराज, हा पुत्र आपलाच आहे.''

''मला माझा विवाह झाल्याचे आठवत नाही. मग पुत्र तरी कसा आठवणार !''

''मी असत्य बोलत नाही महाराज.''

''तू सत्य बोलतेस यावर मी कसा विश्वास ठेवणार ? तुझ्याजवळ काही पुरावा आहे का ?''

''होय महाराज. आपण मला तुमच्या हातातली अंगठी दिली होती. तो पुरावा आहे.''

''कोठे आहे ती अंगठी ?''

शकुंतलेने आपला हात पुढे केला. ती म्हणाली, ''तुमची अंगठी ओळखावी महाराज.'' दरबारातील सर्वजण हसू लागले. राजा हसू लागला.

''आपण सर्व का हसता ?''

राजा म्हणाला, ''कारण, तुझ्या हातातील बोटात एकही अंगठी नाही.''

शकुंतलेने पाहिले तर खरोखर तिच्या हातातील बोटात अंगठी नव्हती. आपली अंगठी कुठे पडली, केव्हा पडली ते तिला आठवेना. ती दु:खी झाली.

राजा म्हणाला, ''तू सांगतेस ते सत्य नाही. तू तुझ्या मुलाला घेऊन निघून जा.''

''मी कुठे जाऊ ? मी तुमची भार्या आहे. हा तुमचा पुत्र आहे.''

''हे सर्व खोटे आहे. तू चालती हो इथून.''

हे ऐकून शकुंतला खूप संतापली. तिचे डोळे लाल झाले. तिचे ओठ थरथरू लागले. ती म्हणाली, ''महाराज, एक पतिव्रता आपल्या मुलाला घेऊन तुमच्या घरी आली आहे. ती असत्य बोलत नाही. तुम्ही आपल्या पत्नीला ओळखत नाही. पुत्राला ओळखत नाही. लोक आपल्या पुत्राला प्रेमाने छातीशी कवटाळण्यास आनंद मानतात. तुम्ही आपल्या पुत्राला स्वीकारायला तयार नाही. हे पातक आहे. तुम्ही मानत नसाल तरी परमेश्वर सर्व काही जाणतो आहे. सत्य काय आहे हे परमेश्वरापासून कोणीही लपवू शकत नाही. तुम्ही जर आपल्या पत्नीला आणि पुत्राला ओळखत नसाल तर, ते मोठे पाप आहे. मी परत जाते, पण सत्य अमर असते. माझे शब्द सत्य आहेत.''

शकुंतला संतापली होती. ती आपल्या पुत्राला घेऊन जाण्यासाठी मागे वळली. तेवढ्यात चमत्कार घडला. अचानक आकाशवाणी झाली.

''राजा दुष्यंत, तू पतिव्रतेचा अपमान करू नकोस. तू सत्याचा स्वीकार कर. शकुंतलेबरोबर तू गांधर्व विवाह केला आहेस. 'सर्वदमन' हा तुझा पुत्र आहे. त्यांचा त्याग करशील तर महान पापाचा तू धनी होशील. आपल्या पत्नीचा आणि पुत्राचा स्वीकार कर. यातच तुझे कल्याण आहे.''

सर्वांनी ही आकाशवाणी ऐकली होती. सर्वजण आश्चर्यचकित झाले होते. सर्व दरबारी लोकांना शकुंतलेचे बोलणे पटले होते. राजा दुष्यंत खजिल झाला. तो धावत पुढे आला. त्याने शकुंतलेला जवळ घेतले. नंतर त्याने आपल्या पुत्राला जवळ घेतले. तो म्हणाला, ''शकुंतला, मला क्षमा कर. तू सत्य बोलत होतीस. आकाशवाणी झाली आणि सर्व गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत. तू माझी पत्नी आहेस. हा पुत्र आपल्या दोघांचा आहे.''

शकुंतलेला खूप आनंद झाला. दरबारात लोकांनी आनंदाने दुष्यंत राजाच्या नावाने घोषणा दिल्या. राजा दुष्यंत म्हणाला,

''शकुंतला, हा आपला सुपुत्र आहे. देववाणी सत्य असते. मी तुझा आणि माझ्या पुत्राचा स्वीकार करतो आहे.''

''महाराज, आज मी धन्य झाले.''

''शकुंतला, या पुत्राचा मी गौरव करतो. याचे नाव 'भरत' ठेवूया. भरत हाच पुढे युवराज होईल.''

सर्वांनाच आनंद झाला. हाच भरत पुढे शूर पराक्रमी राजा भरत झाला. या भरत राजाच्या नावावरूनच या देशाला भारत नाव ठेवण्यात आले अशी कथा आहे.

✦

# राजा शांतनु

राजा भरत हा पराक्रमी राजा होता. त्याने प्रजेला सुखी करण्याचा प्रयत्न केला. तो कर्तव्यनिष्ठ राजा होता. न्यायी राजा म्हणून तो प्रसिद्ध होता. पराक्रमाने राज्यविस्तार करून तो चक्रवर्ती राजा ठरला होता.

पौरव वंशात पुढे शांतनु हा पराक्रमी राजा होऊन गेला. शांतनु हा लहानपणापासून स्वभावाने शांत होता. त्यामुळेच त्याचे नाव शांतनु ठेवण्यात आले होते.

राजा शांतनु राज्यकारभार सांभाळू लागला होता. प्रजेचे कल्याण करण्याचा त्याने प्रयत्न केला होता.

एके दिवशी राजा शांतनु शिकार करण्यासाठी वनात गेला होता. हरिणांच्या मागे त्यांची शिकार करीत तो खूप दूरवर येऊन पोहोचला होता. अचानक त्याला एक विचित्र दृश्य दिसले.

एक सुंदर युवती नदीच्या पाण्यातून बाहेर येत होती. ती तशीच चालत पुढे आली. राजा शांतनु पुढे चालू लागला. त्या दोघांनी एकमेकांना पाहिले. राजा म्हणाला, ''हे सुंदर तरुणी तू आहेस तरी कोण?''

''मी गंगा आहे.''

राजा पुढे होऊन म्हणाला, ''मी राजा शांतनु आहे.''

गंगा फक्त हसली. ती परत नदीकडे जाऊ लागताच शांतनुने तिला थांबवले. तो म्हणाला, ''गंगा थांब. मला तुला काही सांगायचे आहे.''

गंगा पुन्हा हसली आणि म्हणाली, ''महाराज, आता मला गेलं पाहिजे.''

गंगा पुन्हा नदीच्या पाण्यात शिरली. ती खोल खोल जाऊ लागली. काही वेळात ती पूर्णपणे पाण्यात बुडून गेली होती.

राजाला या गोष्टीचे फार आश्चर्य वाटले. तो परत फिरला आणि राजमहालात आला.

राजाला रात्री झोप आली नव्हती. त्याच्या डोळ्यासमोर गंगा येत होती. तो विचार करीत होता. 'ही गंगा कोण असावी ? ती पाण्यात कशी गुप्त झाली ?' गंगाचे सौंदर्य त्याच्या डोळ्यासमोर येत होते. तो नीट झोपू शकला नव्हता.

त्या दिवसापासून तो नदीकिनारी येऊन गंगेची वाट पाहू लागला होता. राजाला पुन्हा एकदा गंगा नदीतून बाहेर येताना दृष्टीस पडली.

राजा शांतनु गंगाजवळ गेला. तो तिच्याशी गोड गोड बोलू लागला. शेवटी तो म्हणाला, ''गंगा, तू माझ्याशी विवाह करून माझी राणी होशील का ?''

गंगा हसू लागली. राजाने विचारले, ''गंगा, माझ्याशी विवाह करण्यास तुझी संमती आहे ना ?''

गंगा म्हणाली, ''महाराज, ही गोष्ट तुमच्या मनाला अजून ओळखता आली नाही ?''

''याचा अर्थ गंगा तू लग्नाला तयार आहेस तर.''

''महाराज, पण यासाठी आपणाला माझी एक अट मान्य करावी लागेल.''

